## प्रकरण १ ले

# प्रस्तावना

# प्रकरण १

# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना :


आज शिक्षणाचे स्वरूप केवळ लिहिणे, वाचणे व हिशेब करता येणे एवढ्यापुरतेच मर्यादित राहिलेले नाही. शिक्षणातून व्यक्तिविकास, पर्यायाने समाजाचा व राष्ट्राचा विकास घडतो. म्हणून शिक्षणाला समाजविकासाचे व राष्ट्रविकासाचे साधन मानले जाते. शिक्षण प्रक्रियेची खालीलप्रमाणे तीन महत्वाची अंगे आहेत.

१) विद्यार्थी : भावना, ऊर्मी असलेला सदैव प्रतिसाद देणारा एक सचेतन प्राणी.

२) शिक्षक : शिक्षणप्रक्रियेचा सुकाणू.

३) अभ्यासक्रम : शिक्षणप्रक्रियेचा नार्ग, दिशा किंवा मार्गातील तपशील अभ्यासक्रमात असतो.

प्रत्येक शिक्षकाला ज्ञानाची त्रिमिती माहित असणे गरजेचे आहे




म्हणजेच शिक्षण विषयक कार्यक्रमात तीन प्रक्रिया महत्वाच्या ठरतात.

१) पहिली म्हणजे शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टये ठरविणे.

२) दुसरी म्हणजे त्या ध्येयानुसार व उद्दिष्टानुसार अभ्यासक्रम तयार करणे.

३) तिसरी म्हणजे दोहोंनाही अनुरूप अध्यापनपद्धतींचा उपयोग करून विद्यार्थ्यांना शिकविणे.

पाठ्यपुस्तक
↓
पाठ्यक्रम
↓
अभ्यासक्रम
↓
उद्दिष्टे
↓
ध्येये

अशापध्दतीने ध्येयांपासून पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यापर्यंतच्या या प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रम निर्मितीला फार महत्व दिले जाते.

अभ्यासक्रम :

अर्थ :अभ्यासक्रमाला इंग्रजीमध्ये 'Curriculum' हा शब्द उपयोगात आणला जातो. या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील 'Currer' या शब्दापासून तयार झाली आहे. याचा अर्थ 'शर्यतीतील घोड्याचा धावमार्ग' यावरूनच 'शिक्षणाचे क्षेत्र', शिक्षणप्रक्रियेचा मार्ग असा अर्थ आपल्याला प्राप्त होतो. विशिष्ट ध्येय गाठण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे अभ्यासक्रम.

पारंपारिक पद्धतीप्रमाणे अभ्यासक्रम म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयाचे चार भिंतीमध्ये पूर्ण करावयाचे शैक्षणिक पाठ ही कल्पना कालबाह्य झालेली आहे. आधुनिक संकल्पनेप्रमाणे वर्गखोली, ग्रंथालय, प्रयोगशाळा, ज्ञानमंडळ यांसारख्या विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना मिळणारे विविध अनुभव व शिक्षक–विद्यार्थी यांच्या आंतरक्रियांचा समावेश अभ्यासक्रमात होतो. आज केवळ ज्ञान व माहिती देणे हे शिक्षणप्रक्रियेचे स्वरूप राहिलेले नाही. तर समूहामध्ये कसे वागावे, सभोवतालच्या घटकांचे निरीक्षण कसे करावे,

स्वत:च्या भावना व विचार कसे व्यक्त करावेत, या क्षमता व कौशल्यांच्या विकासासाठी वर्गातून तसेच वर्गाबाहेरील उपक्रमातून प्रयत्न केले जातात. या सर्वांचा अंतर्भाव किंवा समावेश अभ्यासक्रमात होतो.

अभ्यासक्रमाची व्याख्या :

अनेक तज्ञांनी 'अभ्यासक्रमाची' व्याख्या केलेली आहे.

१) कनिंगहॅम :

"Curriculum is the tool in the hands of the artist (teacher) to mould his material (the pupil) according to his ideals (objectives) in his studio (the school)".

''कलाकाराला (शिक्षकाला) त्याच्या स्टुडिओमध्ये (शाळेत) त्याच्या कल्पनांप्रमाणे (ध्येय व उद्दिष्टानुसार) त्याच्या साहित्याला (विद्यार्थ्याला) आकार देण्याचे साधन म्हणजे 'अभ्यासक्रम' होय.''

२) मन्रो :

"Curriculum embodies all the experiences which are utilized by school to attain the aims of education."

''शैक्षणिक ध्येय साध्य करून घेण्यासाठी शाळेत उपयोगात आणलेल्या सर्वप्रकारच्या अनुभवांचा अभ्यासक्रमात समावेश होतो.''

३) रेमर्स :

"The curriculum is now being defined as all the experiences of the tearner that are under the control of the school".

म्हणजेच ''शाळेच्या नियंत्रणाखाली शिकणाऱ्याला प्राप्त होणाऱ्या सर्व अनुभवांचा साठा म्हणजे अभ्यासक्रम.''

४) मुदलियार आयोग :

''अभ्यासक्रम म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे व रूढ पद्धतीने शिकविले जाणारे विषय नव्हेत, तर शाळेत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या

अनुभवांचा त्यात अंतर्भाव होतो. यादृष्टीने विद्यार्थ्यांच्या जीवनाला सर्व बाजूंनी स्पर्श करणारे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा समतोल स्वरूपात विकास करणारे संपूर्ण शालेय जीवन म्हणजे अभ्यासक्रम''.

तात्पर्य – ''अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांवर संस्कार करणाऱ्या सर्व अनुभव व कृती यांचा समावेश केला जातो. विषय व त्यातील ज्ञान त्याचप्रमाणे विषयज्ञानाव्यतिरिक्त अन्य प्रकारच्या अभ्यासपूरक कार्यक्रमांमधून व शिक्षक–विद्यार्थी व विद्यार्थी–विद्यार्थी संबंधांतून येणारे अनुभव व त्यातून वर्तनाला लागणारे वळण, वर्गात जे काही शिकविले जाते ते, त्याचप्रमाणे विविध शालेय उपक्रमांतून मिळते ते, परीक्षेशी संबंधित असलेले तसेच नसलेलेही. अभ्यासक्रम म्हणजे शालेय जीवनातून मिळणारे सर्व प्रकारचे संस्कारक्षम अनुभव'' हे स्पष्ट होते.

पाठ्यपुस्तक :

आजच्या विज्ञानयुगात संगणकामुळे जगातील कोणत्याही ठिकाणची माहिती अगदी कमी वेळात मिळविता येत असली तरी पुस्तकांचे महत्व मात्र अबाधित आहे. संगणक प्रत्येक वर्गात पोहोचले असले तरी शिक्षणक्षेत्रातून क्रमिक पुस्तके वगळता येणे अशक्य आहे. पाठ्यपुस्तकाशिवाय शिक्षण प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही, हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

ध्येये
↓
उद्दिष्टे
↓
अभ्यासक्रम
↓
पाठ्यक्रम
↓
पाठ्यपुस्तक

} शिक्षणप्रक्रिया

अभ्यासक्रमातील ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्याचे पाठ्यपुस्तक/क्रमिक पुस्तक हे आवश्यक माध्यम आहे.

अर्थ :

'Textbook' या इंग्रजी शब्दासाठी मराठीत क्रमिकपुस्तक, अभ्यासपुस्तक, पाठ्यपुस्तक असे म्हणतात. पाठ्यपुस्तक हे अतिशय महत्वाचे साधन असून विद्यार्थी, शिक्षक, पालक या पाठ्यपुस्तकावर अवलंबून असतात. क्रमिकपुस्तकाचा संबंध गुडस् यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

"A book dealing with definite subject of studies systematically arranged, intended for use at a specified level of instruct & used as a principle source of study material for a given course"

Goods (1972)

व्याख्या :

निरनिराळ्या लेखकांनी पाठ्यपुस्तकाच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत.

१) **Kneating** – "Textbook is a apparatus of Teaching".

२) **C.P.Hill** – "Textbook ought not to be used as a collection which the pupils can use in a variety of active ways".

३) "Any school subject book used by a child for study purposes".

एकंदरीत नेमून दिलेल्या अभ्यासाचा भाग ज्यात असतो किंवा दिलेला आहे, अभ्यास करण्यासाठी ज्या पुस्तकांचा वापर करता येतो, ज्या पुस्तकात विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी आवश्यक असणारा पाठ्यांश वाचावयास मिळतो, अशा पुस्तकांना 'पाठ्यपुस्तक' म्हणतात.

पाठ्यपुस्तकाचे महत्व व स्वरूप विशद करताना सराफ रा.सो.म्हणतात –

पाठ्यपुस्तक हे अध्ययन अध्यापनातील महत्वाचे साधन आहे. ते वर्गात शिकणे, शिकविणे या प्रक्रियांचा आधार आहे. काय शिकवावे याचे दिग्दर्शन पाठ्यपुस्तक करते आणि शिक्षकांना अध्यापन साहित्य पुरविते सामान्य शिक्षकाला पाठ्यपुस्तक हा महत्वाचा आधार असतो. सर्वच विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या प्रक्रियेत पाठ्यपुस्तक अमाप सहाय्य करते.

शैक्षणिक गुणवत्ता अनेक निकषानुसार ठरत असली तरी पाठ्यपुस्तक हा त्यापैकी एक प्रमुख निकष आहे. पाठ्यपुस्तकामुळे विद्यार्थी –शिक्षक यांच्यात शैक्षणिक आंतरक्रिया निर्माण होत असते. वर्गात, वर्गाबाहेर पाठ्यपुस्तकाव्दारेच अधिक प्रमाणात अध्ययन होत असते. विषयाचे पूर्वज्ञान, त्याचे अध्ययन, त्याची उजळणी यासाठी विद्यार्थी पाठ्यपुस्तकांचा उपयोग करतात. तर विषयांची व्याप्ती अभ्यासक्रमानुसार मर्यादित ठेवण्यासाठी पाठ्यपुस्तक हेच साधन उपयोगी ठरते. म्हणून पाठ्यपुस्तक उत्तम दर्जाचे असणे आवश्यक असते. उत्तम पाठ्यपुस्तकाची वैशिष्टे बोकल (१९७०) यांनी पुढीलप्रमाणे नोंदविली आहेत –

''विद्यार्थ्यांच्या परिपक्वतेचा विचार करून विषयास साजेशी, अनुरूप सुलभभाषा, सर्व संबोधनांचा सुस्पष्ट उल्लेख, नेटके विवरण, अभ्यास विषयाशी सुसंबंध व तर्कशुध्दमांडणी, अद्यावत व बिनचूक माहिती, स्वाध्याय व सारांश, आकृत्या व आलेख इ. बाबी गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तकांमध्ये असावे लागतात.''

चांगले पाठ्यपुस्तक हे आशय नियोजन, संघटन, सिध्दांतनिर्मिती, नमुनेदार मार्गदर्शक या वैशिष्ट्यांनी युक्त असते. चांगल्या पाठ्यपुस्तकाचा प्रभाव हा समाजाच्या बौध्दिक विकासावर पडतो. कोठारी आयोगाने चांगल्या पाठ्यपुस्तकात आकर्षकता, बुध्दिमत्तेस प्रेरणा देणे, इ. गुणवैशिष्टे असावीत असे सुचविले आहे.

## अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती प्रक्रिया :

बदलत्या समाजाच्या गरजा लक्षात घेऊन राज्यस्तरावर सखोल अभ्यासक्रम रचना करण्याची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (S.C.E.R.T.) या संस्थेवर असते. हे करत असताना N.C.E.R.T. ने तयार केलेल्या आराखड्यातील ७०% भागाचा विचार करूनच S.C.E.R.T. ला अभ्यासक्रमाची रचना करणे बंधनकारक असते.

अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी महाराष्टामध्ये स्वतंत्र पाठ्यपुस्तके निर्माण करण्याची फार मोठी जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाला पार पाडावी लागते. थोडक्यात राष्ट्रीय पातळीवर निर्धारित केलेली शिक्षणविषयक ध्येयधोरणे तळागळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे एक काम हे मंडळ करते.

१९६७ मध्ये सर्वात प्रथम स्वतंत्र पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ अस्तित्वात आले. या मंडळाने सन १९६७–६८ च्या अभ्यासक्रमानुसार प्रथम पाठ्यपुस्तके तयार केली. त्यापैकी भाषेच्या काही पुस्तकांमध्ये १९७५ मध्ये काही बदल करण्यात आले. त्यानंतर १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार झाले. या नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार झालेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे पाठ्यपुस्तकांची रचना बदलली. १९८६ ते १९९६ या कालावधीत प्रत्येकवर्षी एक इयत्ताप्रमाणे मंडळाने नवीन पाठ्यपुस्तके तयार करून महाराष्ट्रभर प्रसृत केली. सन २००० साली N.C.E..R.T. ने अभ्यासक्रमाचा आराखडा बदलला. त्यानुसार पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने नवीन पाठ्यपुस्तके निर्मितीच्या प्रक्रियेस सुरूवात केली. पण ही प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच २००४ साली N.C.E.R.T. ने पुन्हा नवीन आराखडा प्रस्तुत केला, या दोन्हींचा विचार करून पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने २००६–०७ या शैक्षणिक वर्षापासून इ.१ली व

इ.५वी ची पाठ्यपुस्तके तयार केलेली आहेत. २००८ पर्यंत पाठ्यपुस्तक बदलाचा हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने पूर्ण होणार आहे.

## १.२ संशोधनाची गरज :

वरील विवेचनावरून एक गोष्ट होते ती म्हणजे सामाजिक बदलांचे प्रतिबिंब अभ्यासक्रम बदलात दिसते. कालमानानुसार, गरजेनुसार अभ्यासक्रम रचनेत बदल होतो. अभ्यासक्रम बदलला की पाठ्यक्रम व त्यानुसार तयार होणारी पाठ्यपुस्तके या दोन्हीत बदल होतो. पण हे बदल खरोखरच अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने होतात का? हे पाहणे गरजेचे आहे. अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यात नेमका काय फरक आहे, हे सैध्दांतिकदृष्ट्या पाहणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकाला मूळ अभ्यासक्रमाविषयीची फारशी जाणीवच नसते, असे जाणवते. पाठ्यपुस्तकाचा आशय शिकविणे एवढेच तो आपले कर्तव्य मानतो. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पाठ्यपुस्तकाच्या अध्यापनातून साध्य कशी करावीत याची त्याला फारशी चिंता नसते. म्हणून अभ्यासक्रमाचे जास्तीत–जास्त प्रतिबिंब पाठ्यपुस्तकात पडणे गरजेचे आहे.

संशोधिका स्वत: भाषेची शिक्षिका आहे. केवळ पाठातील आशय सांगून विद्यार्थ्यांना भाषा समजणार नाही. म्हणून अभ्यासक्रमामध्ये भाषेविषयी जी उद्दिष्टे मांडली जातात ती विचारात घेऊन शिक्षकांनी भाषेचे अध्यापन करावे यासाठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा अभ्यासक्रमाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास व्हावा, असे संशोधिकेला वाटते.

भाषा येण्यासाठी श्रवण, वाचन, भाषण, लेखन या चार मुलभूत क्षमतांचा विकास होणे गरजेचे आहे. सन २००४च्या अगोदर भाषेची जी पाठ्यपुस्तके तयार केली होती, त्यातून विद्यार्थ्यांच्या या चारमुख्य क्षमतांच्या विकासाची परिपूर्तता होत नव्हती. 'महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण

अभ्यासक्रम २००४' या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने इ. ५वीच्या वर्गासाठी भाषेची जी नवीन पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. त्यामध्ये संभाषणात्मक पद्धतीला जास्त महत्व असून भाषिक क्षमतांचा विकासाचा विचार केलेला आहे. या नवीन अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या भाषेच्या पाठ्यपुस्तकांच्या विश्लेषणावर आधारीत संशोधने फार कमी आहेत. म्हणून संशोधिकेने इ.५वीची भाषेची पाठ्यपुस्तके यांचा अभ्यासक्रमाशी असलेला संबंध अभ्यासणे, असा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

## १.३ संशोधनाचे महत्व :

पाठ्यपुस्तक हे अध्ययन – अध्यापनाचे अनिवार्य साधन असल्यामुळे भाषा विषयात पाठ्यपुस्तकाला अनन्यसाधारण महत्व आहे. पाठ्यपुस्तक हातात पडल्याबरोबर विद्यार्थ्यांचे लक्ष त्याच्या बाह्यांगाकडे जाते. पण प्रस्तुत संशोधनाच्या सहाय्याने पाठ्यपुस्तकाचे अंतरंग ही तेवढेचे महत्वाचे असते, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.

व्यक्तीचा सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय झाल्यामुळे पुस्तक शिकवून संपविणे एवढाच मर्यादित अर्थ पाठ्यपुस्तकाचा घेऊन चालणार नाही. त्यासाठी त्यामागची संपूर्ण प्रक्रिया लक्षात घ्यावी लागेल, म्हणजेच शिक्षकाचा पाठ्यपुस्तककडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा लागणार आहे. व यासाठी आशययुक्त अध्यापन पद्धती शिकताना सेवापूर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

आपण जो विषय शिकवणार आहोत त्याची उद्दिष्टे समजली, तरच त्याविषयाचे पाठ्यपुस्तक अर्थपूर्ण आहे किंवा नाही हे लक्षात येते, अभ्यासक्रम पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक इ. एकमेकांवर आधारीत आहेत व त्यांच्यामध्ये परस्पर घनिष्ठ संबंध आहे, या बाबी स्पष्ट असल्या तर

पाठ्यपुस्तकाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून जाईल व असा योग्य दृष्टीकोन सेवांतर्गत शिक्षकांमध्ये निर्माण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन फायद्याचे ठरणार आहे.

## १.४ संशोधन समस्येचे शब्दांकन :

सन २००६ साली तयार झालेला महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या भाषेच्या पाठ्यपुस्तकांतील संबंधाचा शोध घेणे.

## १.५ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :

### १. २००६ चा महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम :

सन २००० साली N.C.E.R.T. ने अभ्यासक्रमाचा आराखडा बदलला, त्यानुसार S.C.E.R.T. ने राज्यस्तरावर अभ्यासक्रम रचनेची प्रक्रिया सुरू केली, पण ही प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच २००४ साली N.C.E.R.T. ने पुन्हा नवीन आराखडा प्रस्तुत केला. त्यानुसार S.C.E.R.T. ने अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून २००६ चा अभ्यासक्रम तयार केला. या बदलेल्या अभ्यासक्रमातील इ. ५वीच्या मराठी, हिंदी व इंग्रजीच्या पाठ्यक्रमाचा प्रस्तुत अभ्यासात २००६च्या प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात केलेला आहे.

### २. इ. ५वी ची भाषेची पाठ्यपुस्तके :

S.C.E.R.T. च्या सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार २००६–२००७ या शैक्षणिक वर्षामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांसाठी इ.५वीच्या वर्गासाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाने प्रथम, व्दितीय, तृतीय भाषा म्हणून अनुक्रमे मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांसाठी जी

पाठ्यपुस्तके तयार केली, त्यांचा समावेश इ.५वी ची भाषेची पाठ्यपुस्तके यामध्ये केलेला आहे.

३. संबंधांचा शोध घेणे :

२००६च्या अभ्याक्रमामध्ये उद्दिष्टे, अध्ययन अनुभव/उपक्रम मूल्यमापन योजना, बदलत्या काळाची गरज, प्रात्यक्षिक तासिकांचे वाटप, शिक्षक मार्गदर्शन, स्वाध्याय योजना, प्रकल्पविषयक मार्गदर्शन, आधुनिकीकरण, माहिती तंत्रज्ञान व तज्ञांना मतावली देऊन त्यांच्याकडून निश्चित केलेली मानके यांच्या अनुषंगाने इ. ५वीच्या भाषेच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण करून २००६ च्या महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी त्यांच्या असलेल्या संबंधांचा शोध घेणे, असा कार्यात्मक अर्थ अभिप्रेत आहे.

## १.७ संशोधनाची उद्दिष्टे :

१) २००६च्या प्राथमिक स्तरावरील भाषेच्या अभ्यासक्रमाचे विश्लेषण करणे.

२) इ.५वीच्या मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे आशय विश्लेषण करणे.

३) इ.५वीच्या हिंदी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे आशय विश्लेषण करणे.

४) इ.५वीच्या इंग्रजी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे आशय विश्लेषण करणे.

५) इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा २००६च्या प्राथमिक स्तरावरील भाषेच्या अभ्यासक्रमाशी असलेल्या संबंधाचा शोध घेणे.

## १.७ संशोधनाची गृहितके :

१. अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार पाठ्यपुस्तकांची रचना केलेली असते.

२. अभ्यासक्रम/पाठ्यक्रम यांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकांमध्ये असते.

३. अभ्यासक्रमाचे हेतू साध्य करण्याचे पाठ्यपुस्तक हे एक साधन आहे.

## १.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

### १.८.१ संशोधनाची व्याप्ती :

१) प्रस्तुत संशोधन २००६च्या प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी निगडीत आहे.

२) प्रस्तुत संशोधनामध्ये २००६च्या S.C.E.R.T. च्या अभ्याक्रमानुसार तयार केलेल्या इ.५वीच्या भाषेच्या मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही पाठ्यपुस्तकांचा विचार केलेला आहे.

३) प्रस्तुत संशोधनामध्ये सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार केलेल्या मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही पाठ्यपुस्तकांचा अभ्यासक्रमाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास केलेला आहे.

### १.८.२मर्यादा :

१) प्रस्तुत संशोधनामध्ये केवळ प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचा विचार केलेला आहे.

२) प्रस्तुत संशोधनामध्ये फक्त सन २००६ च्याच प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचा विचार केलेला आहे.

३) प्रस्तुत संशोधनामध्ये फक्त सन २००६ च्या प्राथमिक स्तरावरील मराठी भाषेच्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या फक्त मराठी, हिंदी, इंग्रजी यातील पुस्तकांचा अभ्यासक्रमाशी असलेला संबंध अभ्यासला आहे.

४) प्रस्तुत संशोधनामध्ये फक्त सन २००६च्या S.C.E.R.T. च्या अभ्यासक्रमानुसार तयार केलेल्या इ.५वीच्या भाषेच्या नवीन पाठ्यपुस्तकांचाच विचार केलेला आहे.

## १.९ प्रकरणीकरण :

संशोधिकेने संशोधनाची माहिती कशा प्रकारे मांडली आहे, कोणत्या प्रकरणात कोणत्या घटकांचे विवेचन केले आहे याचा अल्पसा परिचय या घटकात दिला आहे.

### प्रकरण पहिले : प्रस्तावना :

या प्रकरणात संशोधिकेने संशोधन समस्येची पार्श्वभूमी विषद करून प्रस्तुत अभ्यासाची गरज का भासते याचा संदर्भ घेऊन संशोधन विषयाचे महत्व विषद केले आहे. तसेच समस्या विधान, समस्येतील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाचे मार्ग, संशोधन पद्धती स्पष्ट केल्या आहेत.

### प्रकरण दुसरे : संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे समालोचन :

या प्रकरणात संशोधिकेने संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचा आढावा घेतला आहे. इतर संशोधकांनी यापूर्वी आपापल्या संशोधित विषयाशी संबंधित संशोधन कशाप्रकारे केलेले आहे, कोणती पद्धती, कोणती साधने वापरून कोणकोणते निष्कर्ष काढलेले आहेत, हे या प्रकरणामध्ये दिलेले आहे. या प्रकरणामध्ये संशोधिकेला प्रस्तुत संशोधन कसे करावे याविषयी मार्गदर्शन मिळते.

**प्रकरण तिसरे : संशोधनाची कार्यपद्धती :**

या प्रकरणामध्ये संशोधिकेने आपले संशोधन कार्य करण्यासाठी केलेल्या पद्धतीचे वर्णन केलेले आहे. यामध्ये शैक्षणिक संशोधनाच्या पद्धतींपैकी कोणती पद्धती संशोधिकेने निवडली आणि माहिती गोळा करण्यासाठी कोणती साधने निवडली याचे वर्णन केलेले आहे.

**प्रकरण चौथे : संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

या प्रकरणामध्ये संकलित केलेल्या माहितीचे गुणात्मक विश्लेषण करून त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी :**

या प्रकरणामध्ये संशोधिकेने आपल्या संशोधन कार्यातून अभ्यासलेल्या सर्व गोष्टींवरून दिसून आलेले निष्कर्ष व शिफारशी देण्यात आलेले आहेत. तसेच इतर संशोधनासाठी विषय सुचविलेले आहेत.

**समारोप :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची पार्श्वभूमी, संशोधनाची गरज आणि महत्व, संशोधन समस्येचे शब्दांकन, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा इ. स्पष्ट केलेल्या आहेत.

प्रस्तुत संशोधन समस्येचे संदर्भात वाचनात आलेल्या साहित्याचा व संशोधनाचा आढावा पुढील प्रकरणात घेण्यात आलेला आहे.